# परीक्षेनंतर शत्रूचे फाटक काबीज करणे

आश्चर्य वाटते…तुम्हाला ठाऊक आहे, माझ्या मनात एक विचार येतो, लोकांना उभे राहताना पाहून जेव्हा वचन वाचले जाते. तुम्हाला ते आवडत नाही का? आपण उभे राहतो वचनाविषयी आपली निष्ठा दाखविण्यासाठी आपण आपल्या देशासाठी उभे राहतो, आता वचनासाठी का उभे राहू नये?

2 आपण थोडा वेळासाठी उभे राहत आहोत. फार वेळ झाला नाही, मी एक लेख वाचीत होतो आणि मी काल रात्री त्या लोकांबद्दल विचार करीत होतो जे ख्रिस्तासाठी उभे राहिले. जर तुम्ही असे केले नसेल, तर ते तुम्ही आज करू शकत नाही का?

3 जवळ जवळ पंच्याहत्तर वर्षांआधी, तेथे एक महान सुवार्तिक होता, त्याचे नाव मला लक्षात नाही. मला वाटते ते आर्थर मॅक्कॉय होते आणि ते हे जग सोडून गेलेले आहेत. आणि एके रात्री त्यांना स्वप्न पडले होते की ते गौरवात घेतले गेले. आणि म्हणाला तो त्या फाटकापर्यंत गेला, आणि तो म्हणाला ते त्याला आत जाऊ देत नाहीत, आणि तो म्हणाला, “मी अमेरिकेचा आर्थर मॅक्कॉय आहे. मी एक सुवार्तिक आहे.”

4 म्हणून तो द्वारपाल आत गेला, (हे एक स्वप्न होते), आणि तो आत गेला, म्हणाला, “मला तेथे तुझे नाव बिल्कुल सापडले नाही.”

तो म्हणाला, “मी एक प्रचारक होतो.”

तो म्हणाला, “महाशय, मला…”

5 तो म्हणाला, “ठीक, आहे तेथे संभावना आहे की…तेथे काहीतरी चूक आहे.”

6 तो म्हणाला, “नाही महाशय. माझ्याकडे येथे पुस्तक आहे. मला त्यात तुझे नाव मुळीच सापडत नाही.”

आणि तो म्हणाला, “मी त्यासाठी काही करू शकतो का?”

7 तो म्हणाला, “तु तुझे अपील पांढऱ्या सिंहासनाच्या न्यायापुढे ठेऊ शकतो.” देवा, माझे सहाय्य कर. मी तेथे जाऊ इच्छित नाही.

8 तो म्हणाला, “जर मला तीच एक आशा आहे, तर मी माझा खटला तेथे अपिल करीन.”

9 आणि म्हणाला, त्याला वाटले तो त्या मार्गाने गेला, आणि फक्त…आणि त्याने सुरुवात करताच, तेथे काळोख होता, आणि प्रकाश होत गेला आणि असे वाटत होते की तेथे जागाच नव्हती की जेथे तो प्रकाश थांबेल, पण तो बरोबर मध्यभागी होता. आणि तो म्हणाला, “कोणी माझ्या न्यायाच्या सिंहासनाकडे विनंती केली आहे?”

10 तो म्हणाला, “मी आर्थर मॅक्कॉय. मी एक सुवार्तिक आहे, कितीतरी जीवांना मी राज्यात पाठविले.”

त्याने म्हटले, “तुझे नाव पुस्तकात सापडले नाही का?”

“नाही.”

म्हटले, “म्हणून माझ्या न्यायालयात याचिका केली आहे का?”

“हो, महाशय.”

11 “तुला न्याय मिळेल. मी तुझा न्याय माझ्या नियमांनी करीन. आर्थर मॅक्कॉय, तू कधी खोटे बोलला आहेस का?”

12 तो म्हणाला, “मला वाटले त्या प्रकाशापुढे उभे राहीपर्यंत मी चांगला मनुष्य होतो.” तो म्हणाला, “परंतु त्या प्रकाशाच्या उपस्थितीत, मी एक पापी होतो.” आपण सगळेच तसे असू. तुम्हाला आता सुरक्षित वाटत असेल, पण तेथे येईपर्यंत तुम्ही थांबा. तुम्हाला कसे वाटत असेल याचा विचार करा जेव्हा तो अभिषेक करतो? तुम्हाला किती कमीपणाचे वाटेल. पांढऱ्या न्यायाच्या सिंहासनापुढे ते असेल?

तो म्हणाला, “तू कधी खोटे बोललास काय?”

13 तो म्हणाला, “मला वाटले मी सत्याने वागत होतो, पण काही छोटया गोष्टी ज्या मला वाटत होत्या की त्या लहान खोटेपणाच्या स्वरुपात जे तेथे मोठे व ठळक झाले होते.”

तो म्हणाला “होय, महाशय, मी खोटे बोललो आहे.”

तो म्हणाला “तू कधी चोरी केली आहेस का?”

14 तो म्हणाला, “मला वाटत होते की खूप प्रामाणिक होतो, आणि कधी चोरी केली नाही, परंतु म्हणाला, त्या प्रकाशाच्या उपस्थितीत मला—मला जाणीव झाली की तेथे काही व्यवहार होते, जे मी केले जे योग्य नव्हते.”

तो म्हणाला, “हो, महाशय, मी चोरी केली.”

तो म्हणाला “माझी शिक्षा...”

15 आणि तो त्याची शिक्षा ऐकण्यास तयार होता, “त्या न विझणाऱ्या अग्नीत जा जी सैतान व त्याच्या दूतासाठी तयार केली होती,” प्रत्येक हाड सुटे होत होते.

16 तो म्हणाला, “मी एक अतिशय मधूर वाणी ऐकली जी माझ्या आयुष्यात आतापर्यंत कधीच ऐकली नव्हती.” तो म्हणाला, “जेव्हा मी पाहण्यास वळलो, मी एक मधुर चेहरा पाहिला, मधुर माझ्या आईच्या चेहऱ्यापेक्षा मधुर. मधूर वाणी माझ्या आईने आजपर्यंत अशी मधूर हाक मारीली नाही.” मी आजुबाजूला पाहिले. मी एक वाणी ऐकली, म्हणाली, “पित्या हे खरे आहे, तो खोटे बोलला आहे आणि तो प्रामाणिक नव्हता. पण खाली पृथ्वीवर माझ्यासाठी उभा राहिला, आता मी त्याच्या जागी उभा राहीन.”

17 तेथे हेच घडावे अशी माझी इच्छा आहे. मी आताच त्याच्यासाठी उभा राहू इच्छितो, ह्यासाठी की जेव्हा ती वेळ येईल, तो माझ्या जागी उभा राहील.

18 आपण उत्पत्ती अध्याय 22: 15, 16,17 आणि 18 वे वचन वाचूया.

*आणि परमेश्वराच्या दूताने आकाशातून आब्राहामाला दुसऱ्यांदा हाक मारून म्हटले.*

*आणि म्हणाला परमेश्वर म्हणतो मी स्वतःची शपथ घेऊन सांगतो.की तू हे कृत्य केले. आपल्या मुलास, आपल्या एकूलत्या एका मुलास माझ्यापासून राखून ठेवले नाही:*

*यास्तव मी तुला आशीर्वादित करीन,...व वृद्धिच वृद्धि करून तुझी संतती आकाशांतील ताऱ्यांइतकी, समुद्रतीरीच्या वाळूइतकी होईल असे करीन.तुझी संतती आपल्या शत्रूंची नगरे हस्तगत करील;*

*आणि तू माझा शब्द ऐकला म्हणून पृथ्वीवरची सर्व राष्ट्रे तूझ्या संततीच्याद्वारे आशीर्वादित होतील.*

आपण प्रार्थना करूया

19 स्वर्गीय पित्या, हा लेख तुझ्या हाती घे, प्रभू, आणि आमच्यावर राज्य कर प्रभू, तुझा पवित्र आत्मा ही वचने, थेट प्रत्येकाच्या अंतकरणात पोहचवो. तुझी वचने महान आहेत, ह्या दुपारी ती आमच्या अपेक्षा पूर्ण करोत. आणि तु म्हटलेस की तुम्ही भरभरून मागा, यासाठी तुमचा आनंद परिपूर्ण होवो. आम्ही हे येशूच्या नावाने मागतो आमेन

तुम्ही बसू शकता

20 मी ह्या लेखाला नाव देऊ इच्छितो, काही क्षणांसाठी. माझा आवाज कमजोर आहे. म्हणूनच मला माईकच्या जवळ उभे राहावे लागत आहे. मला माहित आहे कि, इथे आवाज परत येत आहे, पण आपल्याला त्याचा थोडा त्रास होईल. मी ह्यास नाव देऊ इच्छितो: *परीक्षेनंतर शत्रूची नगरे हस्तगत* करणे

21 आपल्या दृष्याची सुरुवात एक फार आश्चर्यकारक घटनेनी होते जी आब्राहामाच्या जीवनात घडते. तुम्हाला ठाऊक आहे की अब्राहाम हा विश्वासणाऱ्यांचा पिता आहे. आणि वचन अब्राहामाला देण्यात आले होते. आणि ख्रिस्ताद्वारे जे त्याचे वारस आहेत. आपल्याला हे वचन केवळ अब्राहामद्वारे मिळाले आहे. आता अब्राहाम हा साधारण मनुष्य होता. परंतु देवाने त्याला पाचारण केले होते आणि त्या पाचारणास तो विश्वासू राहिला होता. जेव्हा परमेश्वर त्याच्याशी बोलला, अब्राहामाने एकदाही देवाच्या वचनावर अविश्वास केला नाही. आणि तो त्याच्याशी प्रामाणिक राहिला. त्यात किती ही अडचणी आल्या तरी तो त्याच्याशी प्रामाणिक राहील.

22 आणि देवाने त्याला पुत्र देण्याचे वचन दिले आणि त्याने तो पुत्र मिळेपर्यंत पंचवीस वर्षे वाट बघितली, त्याच्या विरुध्द काहीही बोलणे नव्हते. आणि ह्या पुत्रामध्ये, पृथ्वीची सर्व कुळे आशीर्वादित होणार होती. आणि हा आदरणीय वृध्द पुरुष त्याच्या निवडीशी आणि अभिवचनाशी विश्वासू होता.

23 तो आपल्याकरिता एक आदर्श होता. आपण जे ख्रिस्तामध्ये मृत होतो, आपण अब्राहामाचे बीज आहोत.

24 आता तेथे अब्राहामाचे दोन बीज होते. त्यांतील एक नैसर्गिक बीज होते, दुसरे आध्यात्मिक बीज होते. त्यांतील एक नैसर्गिक होते; देहस्वभावानुसार: दुसरे विश्वासाचे बीज, तो विश्वास, असा कि आपणही अभिवचनाद्वारे अब्राहामाचे संतान होऊ शकतो.

25 आणि तो पंचवीस वर्षांचा मोठा काळ प्रयत्न करीत होता आणि अविश्वासाने दुर्बळ होण्याऐवजी तो विश्वासाने सबळ झाला. पाहा, जर पहिल्या वर्षी झाले नाही तर पुढच्या वर्षी होईल तर मोठा चमत्कार होईल, कारण दोन वर्षे झाली होती. आणि वर्षे जात होती, त्याचे वय वाढत होते आणि शरीर निर्जीव झाले. सारेचे गर्भाशय निर्जीव झाले होते. आणि त्यामुळे त्याची शक्ती निघून गेली होती, आणि तेथे…ते पूर्णपणे अशक्य भासत होते.

26 तुम्ही कधी विचार केला का की देवाने तेथे काय केले? पाहा, त्याने तिचे गर्भाशय केवळ सजीव केले नाही. कारण लक्षात घ्या, जर त्याने तसे केले तर असते, तर लक्षात घ्या जर त्याने तसे केले असते…तेथे त्या दिवसांत, आरोग्याची आणि बाटल्या स्वच्छ करण्याची सोय नव्हती, ज्यामध्ये बाळाला गाईचे दुध देता येईल. पाहिले? त्याला हेही करायला लागले…तिच्या दुधाच्या शीरा सुकल्या होत्या. त्यामुळे तो—तो ते करू शकला नसता…तेथे काहीतरी होणे आवश्यक होते.

27 त्या स्त्रीकडे पाहा शंभर वर्षे वयाची, जिला प्रसूतिवेदना होणार होत्या. तिचे हृदय हे सहन करू शकत नव्हते. ते एका 40 वर्षाच्या स्त्रीसाठी देखील कठीण असेल. तिचे

अंतःकरण हे सहन करू शकत नव्हते, म्हणून तुम्हाला माहित आहे, देवाने काय केले? जर तुम्ही बारकाईने पाहाल...

28 मला ठाऊक आहे की कित्येकजण ह्याबाबत असहमत असतील. जर ते बरोबर आहे तर असे बोलणे योग्य होईल का? पाहा हे माझे स्वतःचे विचार आहेत.

29 पाहा, बायबल हे एक अदभूत पुस्तक आहे. ते असे लिहिले आहे कि, ते ज्ञानी आणि विचारवंत पासून गुप्त ठेवण्यात आले. हे किती जणांना माहित आहे? येशूने देवाचे आभार मानले. तो म्हणाला, "पित्या, मी तुझे आभार मानतो, तू ह्या गोष्टी ज्ञानी आणि विचारवंत ह्यांपासून गुप्त ठेवल्या आणि आमच्यासारख्या बाळकांस प्रकट केल्या." हे एक प्रेम पुस्तक आहे. जेव्हा देवाचे प्रेम तुमच्या अंतःकरणात येते, तेव्हा तुम्ही देवाच्या प्रेमात पडता, तेव्हा तो स्वतःस तुम्हाला प्रकट करतो, पवित्रशास्त्राचा अर्थ. पवित्रशास्त्राचा अर्थ म्हणजे देव स्वतः त्याची वचने तुम्हाला समजावून सांगतो. परंतु, पवित्रशास्त्र, हे दोन ओळींच्या, मध्ये लिहीलेले आहे.

30 आता जसे माझी पत्नी, ओह, ती संपूर्ण जगात सर्वात विस्मयकारक स्त्री आहे, आणि मी खरेच तिच्यावर प्रेम करतो. ती माझ्यावर प्रेम करते. म्हणून जेव्हा मी घरापासून दूर असतो, ती मला पत्र लिहिते, म्हणते, "प्रिय बिल, आता रात्री मी नुकताच मुलांना झोपविले. मी आज कपडे धुतले, आणि सर्व जे तिने केले, आणि असे पुढे." आता ती हे सर्व पत्रात बोलत आहे. परंतु, तुम्ही पाहा मी तिच्यावर इतके प्रेम करितो. आणि आम्ही एवढे ऐक झालो आहे, की मी—मी ओळींच्यामध्येही वाचू शकतो. मला ठाऊक आहे, ती मला काय सांगू इच्छिते, पाहा, जरी तिने मला सांगितले अथवा सांगितले नाही तरी. मला समजते की, तिला काय सांगायचे आहे, कारण हे माझे तिच्यावरचे प्रेम आहे आणि समजूतदारपणावर आहे.

31 अशाप्रकारेच पवित्रशास्त्र लिहिले आहे. पाहिले? ती—ती विद्वत्ता, अगदी बरोबर त्याच्या वरून जाईल; त्यांना ह्या गोष्टी कळणार नाही. पाहा, "त्याला ओळखण्यासाठी," तुमचे वचनावर व त्याच्यावर प्रेम असले पाहिजे, कळले?

32 आता, पाहा, येथे त्याने काय केले. आता बायबल सांगते कि, अब्राहम आणि सारा दोघेही, "वृद्ध–वयातीत होती." हे असे नाही की, ते लोकं केवळ तिथे खूप वर्षापासून एकत्र राहत होते. बायबल असे सांगते, "ते वृद्ध–वयातीत होते."

33 आता पाहा, ह्यानंतर लगेच हा दूत आला, आपण ज्याच्याविषयी बोलत होतो, जो एलोहीम, परमेश्वर होता आणि तो अब्राहमला म्हणाला, "पुढल्या वसंतऋतुत मी तुजकडे खात्रीने परत येईन." हे सर्व नीट पाहा, ते सर्वप्रकारे मंडळीचे दर्शक होते.

34 आता पाहा येथे काय झाले. त्याने केवळ सारेला ढींगळ लावले नाही, आणि अब्राहामासाठी ढींगळ लावले नाही. त्याने त्यांना पुन्हा तरुण पुरुष आणि स्त्री केले. हे जरा विचित्र वाटते, परंतु आता राहिलेल्या वचनाकडे पाहुया. वचन उत्तेजन देणारे आहे आणि तुम्ही वचनाद्वारे उत्तेजित झाले पाहिजे. आता लक्षात घ्या, त्यानंतर लगेच, तो दूत आल्यानंतर लगेच...

35 मी पाहू शकतो की, ती राखाडी केसांची सारा, लहान आजी, तिच्या खांद्यावर शाल घेतलेली, आणि एक लहान धुळ्येयी टोपी, हातात काठी घेऊन आजुबाजूला फिरणारी. "मी जरुर म्हातारी फिरणारी, व माझा धनीही वृद्ध झाला आहे, तर मला आता हे सुख?" पाहिले? आणि येथे अब्राहम होता, मोठी दाढी असलेला, हातात काठी धरलेला, कारण तो वयातीत झाला होता.

36 आणि मी बघतो, दुसऱ्या सकाळी त्याचे खांदे मजबूत होऊ लागले, पाठीतले कुबड नाहीसे झाले. तिचे केस बदलायला सुरुवात झाली. ते तरुण व तरुणी झाले. हेच दाखवित होता की, तो अब्राहामाच्या राजकीय बीजाबरोबर काय करणार आहे, "पाहा जेव्हा आपणही डोळ्याचे पाते लवते न लवते, तोच क्षणात निमिषात बदलेले जाऊ आणि अंतराळात घेतले जाऊ."

37 पाहा काय झाले. हे मला तुम्हाला सिध्द करून दाखवू दे मग ते तेथून प्रवास करीत, ते गमोरा येथे होते; गरार येथे गेले, खाली पलीष्टी देशात. तुमच्या लक्षात आले का? नीट नकाशात पहा, ते किती दूर आहे ते. एक खडतर प्रवास त्या वृद्ध वयाच्या जोडप्यासाठी.

38 आणि त्याशिवाय, त्या—त्या पलीष्टी देशात, तेथे अमालेख नावाचा, एक तरुण राजा होता व तो पत्नीच्या शोधात होता. आणि त्याच्याकडे तेथे खूप सुंदर पलीष्टी मुली होत्या, पण जेव्हा त्याने आजीला पाहिले, तो म्हणाला, "ती दिसण्यास फार गोरी आहे." आणि तो तिच्या प्रेमात पडला आणि तिच्याशी लग्न करण्याची त्याला इच्छा झाली. हे बरोबर आहे. ओह. पाहा, ती सुंदर होती. पाहिले?

39 तिचे एका तरुण स्त्रीमध्ये रुपांतर झाले होते. पाहा, तिला ते संतान आणायचे होते, देवाने तिला नवीन उत्पती केले होते, आणि तिला हे मुल वाढवण्याचे होते. आणि लक्षात घ्या, अब्राहम, "त्याचे शरीर मृत झाले होते," आणि सारा मरण पावली, जेव्हा अब्राहाम हा...इसहाक हा पंचेचाळीस वर्षाचा होता, मी विश्वास करतो, जेव्हा सारा मृत्यू पावली. आणि त्यानंतर अब्राहामाने दुसऱ्या स्त्रीशी लग्न केले आणि त्याला सात मुलगे व आणखी मुली झाल्या. हा–हा! आमेन.

40 पाहा ओळींच्या मध्ये वाचा. ती एक छाया आहे. हे दाखविते की तो सर्व अब्राहामाच्या संतानाबरोबर काय करणार आहे. आपण त्याच्या फार जवळ आहोत म्हणून मित्रांनो, आपले वाकलेले खांदे आणि सर्व गोष्टी ह्याने काही फरक पडत नाही. आपले पांढरे केस आणि काहीही असो त्याने आता काहीच फरक पडत नाही. आपण मागे पाहत नाही. तर आपण पुढे पाहूया, आपल्यासाठी काय ठेवले आहे.

41 आणि लक्षात घ्या, हे चिन्ह जे आपण पाहत आहोत, ते शेवटचे चिन्ह जे अब्राहाम आणि सारेने पाहिले अभिवचनाचे संतान येण्याअगोदर. आम्ही विश्वास ठेवतो की, आम्ही त्याच वेळेत राहत आहोत.

42 तो आदरणीय कुटुंब प्रमु, ह्या मुलाच्या जन्मानंतर. तुम्ही कल्पना करू शकता काय, इसहाक जवळ जवळ बारा वर्षाचा लहान गोड कुरळ्या केसांचा मुलगा, भुऱ्या डोळ्यांचा? मी कल्पना करू शकतो की त्या आईला कसे वाटले असेल, सुंदर तरुण स्त्री आणि तसेच, आणि त्याचे वडील. आणि एके दिवशी, देव म्हणाला, उदाहरणाखातीर, आपण जी वेळ येणार आहे; त्यापासून लांब आहोत. "मी ह्या लेकराद्वारे तुला राष्ट्रांचा पिता केले आहे, परंतु माझी इच्छा आहे की ह्या मुलाला तू, मी तुला सांगेन त्या डोंगरावर अर्पण करावे." तूम्ही हा विचार करू शकता काय?

43 तुम्हावर अशाप्रकारच्या परीक्षेस कधीही तोंड द्यावे लागले नाही. तो हे आता करीत नाही. ते उदाहरण छायारूप आहे.

44 अब्राहाम भ्याला का? नाही, महाशय. अब्राहाम हे म्हणाला, "मला पूर्ण ठाऊक आहे की तो त्याला मेलेल्यांतून उठविण्यास समर्थ आहे. कारण मी त्याला मेलेल्यांतून स्विकारले आहे. आणि जर देवाने मला हे करण्याची आज्ञा दिली आहे, आणि मी त्यासंबंधी निष्ठेने राहिलो आहे, आणि ती पाळली आहे, ज्याने मला तो पूत्र दिला;

देव त्याला मेलेल्यांतून उठविण्यास समर्थ आहे; ज्याच्याकडून मला तो मिळाला आहे, हे दर्शक होते."

45 ओह, माझ्या मित्रा! जर देव तुम्हा पेंटेकोस्टलना पवित्र आत्मा देतो, अन्य भाषा बोलण्याचे दान देतो, तर तुम्ही त्याच्या आरोग्यसामर्थ्यावर आणि त्याच्या चांगुलपणावर आणि दयेवर किती विशेषकरून विश्वास ठेवायला हवा! जर त्याने हे केले आहे, देशातील सर्व देवविषयक ज्ञानी त्याच्या विरुद्ध असतील! ते म्हणाले ते हे करू शकत नाही, पण देवाने हे केले कारण त्याने ते वचन दिले आहे. देवाच्या वचनावर विश्वास ठेवा, देव हे बोलला आहे, आणि तेच अंतिम सत्य!

46 पाहा, तेथून त्याला घेऊन गाढवावर तीन दिवसाचा प्रवास होता. आता मी चालू शकतो, जेव्हा मी कामावर असतो व पहारा देत असतो मी रोज जंगलांतून तीस मील चालतो आणि आमच्याकडे इंधन नसते तर आम्ही एवढे लांब पाऊलांनी चाललो नसतो, मला हे सांगायचे आहे. परंतु त्यांच्याकडे वाहतुकीचा केवळ मार्ग एकतर गाढवावर किंवा चालून असे. आणि जेथे तो होता तेथून तीन दिवसाचा प्रवास केला, आणि तिसरे दिवशी त्याने दृष्टी वर करून ती जागा दुरून पहिली, जंगलात आणि पाहिले तो डोंगर दूर होता.

47 त्याने इसाहाकाला घेतले आणि त्याचे हात बांधले. जे आपण सर्वांना ठाऊक आहे उत्पती 22 मध्ये हे आहे हे ख्रिस्ताला दर्शवितो. त्याला डोंगरावर नेले, बांधून, जसे येशूला ही डोंगरावर नेण्यात आले, कलवरी डोंगरावर हे देवाला दर्शवितो, ज्याने आपल्या पुत्राला दिले.

48 परंतु जेव्हा ते तेथे वर गेले आणि तो आज्ञाधारक होता. तेव्हा इसहाकाला थोडीशी शंका यायला सुरुवात झाली. तो म्हणाला, "बाबा! पाहा विस्तव व लाकडे आहेत पण होमार्पणासाठी कोकरू कोठे आहे?"

49 आणि अब्राहाम ज्याला याविषयी कल्पना होती. तरी ते देवाचे वचन कायम स्वरूपी होते, तो म्हणाला, "बाळ देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल." त्याने त्या ठिकाणाचे नाव, "याव्हे–यिरे" ठेवले.

50 आणि जेव्हा त्याने त्याच्या मुलाला बांधले, तो मारण्यासाठी तयार होता; त्याने त्यास बांधून वेदीवरच्या लाकडावर ठेवले, हात पुढे करून सुरा काढला, आणि जेव्हा हे त्याने केले, कशाने तरी त्याचा हात पकडला आणि म्हणाला, "अब्राहाम, तू मुलावर आपला हात चालवू नको."

51 आणि त्याच वेळेस, आपल्यामागे झुडपात शिंगे गुंतलेला एक एडका त्यास दिसला.

52 कधी तुम्ही विचार केला आहे का, तेथे तो एडका कुठून आला? लक्षात घ्या, तो देश सिंह आणि लांडगे आणि कोल्हे, आणि मेंढी यांना खाणाऱ्या हिंस्त्र श्वापदांनी भरलेला होता. आणि तो लोकवस्तीपासून कितीसा दूर होता? आणि डोंगरावर, जेथे कोठेही पाणी नव्हते. आणि त्याने वेदी तयार करण्यासाठी आजूबाजूचे दगड उचलले. तेथे तो एक एडका कुठून आला? पाहा?

53 परंतु तो दृष्टांत नव्हता. त्याने एडक्याला मारले. त्यात रक्त होते. तो काय म्हणाला? "देव स्वतः होमार्पणासाठी कोकरू पाहून देईल."

54 *तू त्या खुर्चीपासून कसा निघशील? तो* अकार्यक्षम मुलगा कसा बरा होईल किंवा *तू त्या खुर्चीपासून, तू तेथून तू जो* हृदयविकाराने पिडीत आहेस? काहीही असो, "देव स्वतः सर्व काही पुरविण्यास समर्थ आहे."

55 अब्राहामाने हा विश्वास ठेवला. तो आदरणीय पुरुष वचनाला सत्याने धरून राहिला आणि त्याने अभिवचन दिले, की, “तुझी संतती! कारण तू माझ्या शब्दावर विश्वास ठेवला, आणि कोणत्याही परिस्थितीची पर्वा न करता तुझी संतती त्या शत्रूचे फाटक काबीज करील.”

56 का? प्रत्येक शत्रू जो अब्रा–...अब्राहामाविरुद्ध उभा राहिला, हा शत्रू जसे दर्शकांच्या स्वरुपात “ती खूप वृध्द झाली आहे. मी खूप वृध्द झालो आहे. *असे* सर्व, आणि सर्व इतर गोष्टी.” तरीही तो वचन सत्याने धरून राहिला.

57 आता, मनुष्याकडे जेव्हा असा विश्वास असतो, तो इतर परिस्थितीकडे न पाहता देवाचे वचन धरून राहील. जर तुम्ही ते करू शकत नाही, तर तुम्ही अब्राहामाची संतती नाहीत. तोच विश्वास जो अब्राहामाचा होता, त्याच्या संततीकडेही असेल.

58 अब्राहामाकडे त्याच्या “संतती” चे वचन होते, त्याची राजाची संतती, जसे मी तुम्हाला अगोदर सांगितले आणि ही मोहर जी त्याने अब्राहामाला दिली, ती वचनाची मोहर होती आणि ती राजाची संतती, इफिस 4:30 प्रमाणे, “पवित्र आत्म्याच्या योगे मूद्रित केली आहे,” जेव्हा ते परीक्षेत उतरले. ह्याविषयी विचार करण्याचा प्रयत्न करा.

59 कित्येकांना वाटते की त्यांच्याकडे पवित्र आत्मा आहे. कित्येक पवित्र आत्मा असण्याचा दावा करतात. कित्येक त्याविषयीचा पुरावा व चिन्हे दाखवितात. परंतू जर ते वचनाला धरून राहू शकत नाही, तर तो पवित्र आत्मा नाही. पाहिले?

60 जर तुम्ही प्रत्येक वचनावर विश्वास ठेवता, तर कसोटीनंतर तुम्ही मूद्रित झालेले आहात. जेव्हा आपण प्रत्येक वचनावर विश्वास ठेवतो, तर तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मूद्रित झाला आहा, ते वचन प्रस्थापित करण्यासाठी. तेच अब्राहामाने केले, अशाप्रकारे त्याने केले. आणि मगच फक्त, आपल्याला शत्रूंची नगरे हस्तगत करण्याचा अधिकार मिळतो. ते तुम्ही करू शकत नाही जोपर्यंत पहिल्याने तुम्ही त्याची संतती होत नाही. लक्षात ठेवा. पवित्र शास्त्रात...

61 ह्या विषयावर मी होस्टन किंवा कोठेतरी दुसरीकडे...बोललो आहे, मला वाटते दलास येथे. *ते चिन्ह* ह्या विषयावर.

62 पाहा, इस्त्राएलात, युहुदी दाखवू शकतो, की तो सुंतेमुळे युहुदी आहे. पण देव म्हणतो, “जेव्हा मी रक्त पाहतो! आणि रक्त तुमच्यासाठी चिन्ह असेल.”

63 जे जीवन रक्तात होते ते उपासकाची पापे दूर करण्यास समर्थ नव्हते कारण, ते पशूंचे रक्त होते, तर मग ज्या पुढे होणाऱ्या चांगल्या गोष्टी आहेत त्यांची नियमशास्त्रांत छाया आहे. तर रक्त स्वतः; ते लाल असे, दरवाज्यावर व दारबाह्यावर असले पाहिजे.

64 एजोबाने लावणे, जी एक रानटी औषधी वनस्पती आहे ती दर्शवित आहे की तुमच्यात खूप मोठा विश्वास आणण्याची गरज नाही. तुमच्यामध्ये एक साधा विश्वास जसा तुमची गाडी चालू करण्यासाठी किंवा मंडळीत येण्यासाठी लागतो तो, पाहिलत? खूप लोक विचार करतात की त्यांच्याकडे काहीतरी असणे...परंतु तसे नाही. एक सामान्य विश्वास रक्त लावण्यासाठी वचन ऐका, आणि वचनावर विश्वास ठेवा, ते उपयोगात आणा, हेच सगळे काही आहे. फक्त रानटी वनस्पती घ्या, जी पलिस्तीमध्ये कुठेही सापडत असे ती एजोब होती, लहान रानटी वनस्पती जी भिंतीच्या भेगांमध्ये उगवते, आणि सभोवताली ती रक्तात बुचकळून ते रक्त चौकटीवर आणि दारबाह्यावर लावत होते.

65 आणि लक्षात घ्या, मी ह्या गोष्टींची पर्वा करीत नाही की ते करारामध्ये किती होते, युहुदी किती दाखवू शकत होता की ते सुंता झालेला आहे, तो किती चांगला व्यक्ती होता, संपूर्ण करार रद्द होतो जर तेथे ते—ते चिन्ह नसेल तर. "जेव्हा मी रक्त पाहीन" फक्त रक्त.

66 तर आता, रक्त आता ते चिन्ह आहे, पण चिन्ह हे रसायनशास्त्र नाही, प्रभू येशू ख्रिस्ताच्या रक्ताचे रसायनशास्त्र, कारण हजारो वर्षांअगोदर ते सांडण्यात आले.

67 परंतु, तुम्ही पाहा, तेथे जे रसायनशास्त्र होते, प्राणीमात्राचे जीवन मनुष्यावर येऊ शकत नव्हते, कारण प्राणीमात्राच्या जीवनात जीव नव्हता. प्राणीमात्रांना चांगले व वाईट ह्याची जाण नाही. तो मनुष्य आहे ज्यात जीव आहे.

68 परंतु जेव्हा येशूने, जो देवपुत्र, कुमारी पासून जन्मलेला, त्याचे रक्त सांडले, त्या रक्तात जे जीवन होते ते स्वतः देवाचे होते. पवित्र शास्त्र सांगते, "आपले तारण त्या जीवनाद्वारे; देवाच्या रक्ताद्वारे झाले आहे,"यहूदी लोकांच्या रक्ताने नव्हे, परराष्ट्रीयांच्याही रक्ताने नव्हे; तर देवाच्या जीवनाद्वारे. देवाने ही रक्तपेशी तयार केली, कुमारीकेपासून जन्म पावलेला तीला पुरुष ठाऊक नव्हता, किंवा तिने...तिच्यापासून अंडाशय ही आले नव्हते.

69 हे मला ठाऊक आहे लोक विश्वास करू इच्छितात की अंडयाने केले. संवेदनेशिवाय अंडाशय तेथे निर्माण होऊ शकत नाही, मग देवाने काय केले असेल बरे? पाहा?

70 त्याने अंडे आणि रक्त पेशी दोन्हीही निर्माण केले. ते देवाचे तात्पुरते व पवित्र निवासमंडप होते, "मी माझ्या पवित्र जणाला कुजण्याचा अनुभव येऊन देणार नाही." पाहा, अंडे कुठून आले? "त्याचा जीव अधोलोकात सोडणार नाही." त्याचे शरीर पवित्र होते! आहे! तुम्ही त्यावर विश्वास ठेवू शकत नाही, तुम्ही नाही, तुम्ही स्वतःला कसे काय ख्रिस्ती म्हणू शकता?

71 "आपले तारण देवाच्या रक्ताद्वारे झाले आहे." तेथेच माझा विश्वास आहे. तेथे आपण संदेष्टयाच्या रक्ताद्वारे जाऊ शकत नाही, सामान्य मनुष्याच्या रक्ताद्वारे जाऊ शकत नाही, किंवा एक शिक्षक एका देवाविषयक ज्ञानात प्रवीण असलेला त्याच्या रक्ताद्वारे नाही. आपण तेथे देवाच्या रक्ताद्वारेच जाऊ शकतो. असे देव बोलला. तो मनुष्य झाला. त्याने त्याचे नाव बदलले. त्याने त्यांचा तंबू लांब खेचला, आपल्याबरोबर आणि आपल्यांतील एक झाला. तो आपला जवळचा सोडवणूक करणारा झाला. त्याला आपल्या निकटचा व्हावे लागले, कारण तसा नियम होता. तो मनुष्य झाला व आमच्यामध्ये वस्ती केली.

72 लक्ष दया ते कसे झाले, हे करताना, तो त्याच्यापासून आला, देव होता. त्याचा आत्मा आणि तोच आत्मा विश्वासणाऱ्यावर आला. म्हणून जीवन जे आपल्या बलिदानात होते, आपली ओळख त्याच जीवनाव्दारे होते.

73 तर देवाचे जीवन लोकांमधून फिरताना पाहूनदेखील ते त्याला अशुध्द कसे म्हणू शकतील, जेव्हा तेच आपल्या बलिदानाची ओळख आहे? "जो माझ्यावर विश्वास ठेवतो, जी कामे मी करितो ती तोही करील." त्याचे जीवन बलिदानामधून परत येते...त्या बलिदानामधून, कारण आपण आपले हात त्यावर ठेवतो आणि स्वतःला आपल्या विचारांबद्दल मृत समजतो. मग आपण संप्रदायांना आपणास त्या रीतीरिवाजाकडे आणि अशा गोष्टीकडे कसे वळवून देतो, आणि म्हणतो आम्ही त्याचा विश्वास करतो? आपण त्या गोष्टीसाठी मेलो आहोत.

74 पौल म्हणतो, "ह्या गोष्टींची मी चिंता करीत नाही" कारण तो संपूर्ण सत्याशी, ख्रिस्ताशी बांधला गेला होता. आणि प्रत्येक खरे यश हे पूर्णतेशी बांधलेले असते, आणि

माझी पुर्णता म्हणजे वचन आहे. आणि बाकी सगळे, ते—ते जे खरोखर आत्म्याने जन्मलेले आहेत, त्यांच्यासाठी देवाचे वचन हेच संपूर्ण सत्य आहे. मी त्यास बांधलो आहे. मी माझे हात त्यावर ठेवले आहेत. आणि माझी ओळख त्याच्यातच आहे. आम्हाला माहीत आहे की त्याने वचन दिले की त्याची ओळख आपल्याला देईल. तो खरा विश्वास आणतो, तुझा स्वतःचा विश्वास नाही पण त्याचा विश्वास, अशी गोष्ट ज्यावर तुमचे नियंत्रण नाही. तो ते करतो आता लक्ष दया तेव्हा, आणि तेव्हाच फक्त, जेव्हा...ते अभिवचन त्याने तुम्हाला दिले आहे.

75 तुम्ही किती मंडळ्यांत जाता ह्याचा त्याच्याशी काहीच संबंध नाही, तुम्ही कितीवेळा बाप्तीस्मा घेतला. तुम्ही पुढे, मागे, तुम्हाला ज्या मार्गाने जावेस वाटते तेथे जा. जोपर्यंत तो शिक्का तुमच्यावर लावण्यात येत नाही, मग तुम्हाला असे बोलण्याचा आधिकार नाही की तुम्ही त्या बलिदानाशी जडलेले आहात.

76 आणि देवाचा शिक्का काय आहे? इफिस 4:30 म्हणते, "देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करू नका; खंडणी भरून प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही ह्या आत्म्याच्या योगे मूद्रीत झाला आहा." एका संजीवनातून दूसरीकडे जाण्याने नव्हे, परंतु सार्वकालिक मूद्रित केले आहे, मूक्तीच्या दिवसापर्यंत.

77 आणि लक्षात ठेवा जर तुम्ही देवाच्या विचारात नसता, तर तुम्ही देवा बरोबर कधी असणार नाही. किती जणांना ठाऊक आहे की तो मुक्तीदाता होता. (मंडळी म्हणते "आमेन"—संपा.) मग ज्यांना मुक्ती मिळाली आहे, त्यांचे जेथून पतन झाले होते तेथून परत त्यांना उभारणे आहे. जर तो आपल्याला मुक्ती देण्यास आला, तर एकेवेळी आपली मुक्ती होण्याची गरज नव्हती असे कसे होऊ शकते, आणि आपण सर्व "पापात जन्मलो दुष्कर्मात वाढलो, ह्या जगात खोटे बोलत आलो"? ते हेच दाखविते की खरा ख्रिस्ती हा देवाच्या विचारांचा गुणधर्म गुणविशेष आहे. हे जग, किंवा तारे, किंवा हवा किंवा कुठलीही गोष्ट होण्याअगोदर. तो सार्वकालिक आहे, आणि तो आम्हाला परत मुक्त करण्यास आला. तो देवाचा विचार आहे, शब्दात बोललेला, प्रकट झालेला आणि पु...पुन्हा त्याच्या विचाराकडे परत आणलेला.

78 निकटचा मुक्तीदाता! हेच कारण आहे की देवाला आपल्याला मूक्ती देण्यासाठी, स्वतःला आपल्यामधील एक असे व्हावे लागले. ते दुसरे कोणी करू शकला नसता. एक दूत ते करू शकत नव्हता, दुसरे कोणीच नाही. त्याला खाली यावे लागले, आपल्यासारखा मोहात पडला, आम्हाला मुक्ती देण्यासाठी.

79 आपण आता अब्राहामाची नैसर्गिक संतती पाहूया. आपण काही नैसर्गिक संततीचे परीक्षण करूया आणि पाहूया कि देवाने आपले वचन नैसर्गिक संततीसाठी, जो इसहाक होता, पाळले कि नाही. आपण काही नैसर्गिक संततीचे परीक्षण करूया जिने देवाच्या पूर्ण वचनावर विश्वास ठेवला आणि काहीही शंका बाळगली नाही. आता लक्षात घ्या, तेथे दहा हजारो, हजारो पटीत लोक होते, ज्यांची सुंता झाली होती आणि इतर सर्व गोष्टी, आणि तरीहि ते अब्राहामाचे संतान नव्हते. खचित "कारण जो बाह्यात्कारी यहूदी तो यहूदी नव्हे; जो अंतरी यहूदी तोच यहूदी होय." ते, त्यांच्यांतील कित्येक अपयशी ठरले अगदी अयशस्वी.

80 पाहा, अरण्यांत, ते म्हणाले, "आम्ही..." वल्हांडणाच्या दिवशी, किंवा त्या झऱ्याकडे पाणी पीतेवेळी, संत योहान 6. ते सगळे आनंद करीत होते.

81 येशू म्हणाला, “मी तोच खडक आहे, जो अरण्यात होता. देवाकडून आलेली, स्वर्गांतून उतरलेली जिवंत भाकर मीच आहे; ह्या भाकरीतून जो कोणी खाईल तो मारणार नाही.”

82 ते म्हणाले, “आमच्या पूर्वजांनी अरण्यात चाळीस वर्षे मान्ना खाल्ला.”

तो म्हणाला, “आणि ते, प्रत्येकजण, मेले आहेत.”

83 *मेले,* तो शब्द घ्या, त्याचा अर्थ “सर्वकाळासाठी वेगळे होणे.” तरी ते अब्राहामाचे बीज होते. *मृत्यू* म्हणजे “वेगळे होणे, संपूर्ण नाश पावणे, संपूर्ण नष्ट होणे, संपूर्ण नाश पावणे.” येशूने म्हटले ते सर्व मेले, प्रत्येकजण, जरी ते सुंता केलेले यहुदी होते.

84 पाहा बिचारे लोक, केवळ आम्ही मेथोडिस्ट, बाप्टिस्ट, प्रेसबेटेरियन आहोत, थोडी पापांची कबुली केली आहे, आणि अशाच काही गोष्टी; सैतानही तसाच विश्वास करतो जितका आपण करतो.

85 परंतु हे तुम्हाला कळले पाहिजे. देवाने त्याची साक्ष दिली पाहिजे, त्याच्या पवित्र आत्म्याने मुद्रित करण्या योगे. वचनाविषयी शंका नाही!

86 जर तुम्ही म्हणाला, “ते दुसऱ्या दिवसासाठी होते.” तर तेथे काहीतरी चुकीचे आहे.

87 काय होईल जर एखादा माणूस धावत आला आणि तुम्ही त्याला सांगितले प्रकाश चमकत आहे, आणि तो खाली तळाशी धावत गेला, म्हणाला, “मी ते नाकारतो, मी ते नाकारतो, तेथे असा प्रकाश अशी काही गोष्ट नाही, मी ह्यावर विश्वास ठेवीत नाही?” त्या माणसाबरोबर काहीतरी चुकीचे आहे. तो मानसिकरीत्या खालावलेला आहे. जर तो त्या उबदार किरणांना नाकारतो आणि त्याच्या जीवन देणाऱ्या स्त्रोताला, तर मानसिकरीत्या तेथे काहीतरी चुकीचे आहे.

88 आणि जेव्हा मनुष्य देवाचे वचन पाहतो, त्याच्यापुढे नम्र होतो आणि त्याची ओळख घेतो, आणि उघड संप्रदायाचे शिकवण सोडतो आणि पुन्हा घेतो, तेथे त्या माणसाबरोबर काहीतरी आत्मिकरित्या चुकीचे आहे. काहीतरी त्याच्याबरोबर चुकीचे आहे. तेथे आत्मिकरित्या काहीतरी चुकीचे आहे. तो हे स्वीकारू शकत नाही. “आंधळे आहेत आणि त्यांना ते माहित नाही.” न्यायाकडे जात आहेत. आणि देव न्यायाधीश असेल.

89 लक्षात घ्या, जेव्हा त्यांनी—त्यांनी हे केले, आणि ती संतती जिने विश्वास ठेवला, निरीक्षण करा काय झाले, आता त्यांतील काहींचे परीक्षण करूया, अब्राहामाच्या संततीपैकी.

90 आपण त्या इब्री मुलांना पाहूया, कारण ते सत्याने उभे राहिले आणि मूर्तीपूजा सहन करू शकले नाही. त्यांनी राजाने स्थापिलेल्या सुवर्णमूर्तीला दंडवत घालण्यास नकार दिला, ती मूर्तीसुद्धा, एका पवित्र पुरुषाची दानीएलाच्या प्रतिरुपामध्ये केली होती.

91 हे असे दर्शवित आहे कि, परराष्ट्रीयात एक चुकीची प्रथा सुरु झाली, ती म्हणजे पवित्र पुरुषाच्या प्रतिरुपाची उपासना सुरु झाली. हे तसेच चालेल, जेव्हा लोकांवर, लोकांच्या प्रतिमेची उपासना करण्यांचा दबाब आणला जाईल. ते प्रकटीकरणाने समजले, कारण दानीएल वचनाचे भाषण अनुवाद करू शकला, जो भिंतीवरील हस्तलेख होता. अशाप्रकारे ते आत आले, आणि अशाप्रकारे ते बाहेरही गेले अशाच प्रकारे, परराष्ट्रीयात ते रूप प्रकट झाले.

92 पाहा, त्यांनी ते करण्यास नकार दिला. आणि त्यांनी काय केले? ते अब्राहामाची संतती होते जे वचनावर सत्याने उभे राहिले होते आणि त्यांनी शत्रूचे फाटक, म्हणजे तो अग्नी, हस्तगत केले.

93 दानिएल, एकाच देवाला भजत असे म्हणून त्याची कसोटी घेण्यात आली. ह्या परीक्षेसमयी, तो परीक्षेत खरा ठरला. आणि देवाने काय केले हे असे दिसत होते जणूकाही त्याचा पराभव झाला, असे आपण म्हणूया? आणि त्यांना माहीत नव्हते काय करावे. ते त्याला सिंहास खायला देणार होते. परंतु दानीएल ह्या परीक्षेत खरा राहिला, की एकच खरा परमेश्वर आहे, आणि त्याने शत्रूचे फाटक हस्तगत केले. देवाने सिंहाचे तोंड बंद केले होते.

94 मोशेही खोटे मांत्रिक जादुगार, यान्नेस आणि यांब्रेस यांच्यासमोर, परीक्षेच्या समयी, सत्याने अभिवचनावर उभा राहिला. पाहा, देव मोशेला अदभूतरित्या भेटला, त्याला म्हणाला की तू जा आणि ह्या गोष्टी कर, ही चिन्हे त्याला दाखव आणि प्रत्येक चिन्हामागे एक वाणी असेल. मोशे त्याप्रमाणे तेथे गेला, त्याने काठी खाली टाकली आणि तिचा साप झाला. तुम्हाला ठाऊक आहे काय झाले? तेथे जादुगार आले आणि त्यांनाही तसेच केले.

95 तेव्हा, मोशेने हात झटकून असे बोलला नाही, "की मला वाटते ते सर्व खोटे आहे." तो तेथेच उभा राहिला आणि देवाची वाट पाहिली. तो सत्याने उभा राहिला. तेथे कितीही मांत्रिक, जादुगार असेनात, तो सत्याने उभा राहिला. आणि त्याला नेमून दिलेल्या कामाला तो सत्याने धरून राहिला, त्या लोकांना मिसरांतून बाहेर काढण्यासाठी. जेव्हा त्याच्या मार्गात समुद्र होता, देवाने तो त्याच्या हाती दिला, आणि त्याने समुद्राचे दोन भाग अग्निस्तंभाच्या सहाय्याने केले, जो त्याचे मार्गदर्शन करीत होता. त्याने लोकांना वचनदत्त देशात नेले.

96 यहोशवा, दुसरा महान पुढारी, फक्त दोन...वचनदत्त देशात गेले, यहोशवा आणि कालेब. ते कादेश नावाच्या प्रदेशाकडे आले, जे त्यावेळी जगातील मध्यवर्ती ठिकाण होते, ते न्यायाचे आसन होते. आणि बारा वंशातून त्यांनी तो देश पाहण्याकरिता बारा हेर पाठविले आणि बाराही जण परत आले.

97 त्यांतील दहा जण म्हणाले, "त्या लोकांवर स्वारी करण्यास आपण मुळीच समर्थ नाही, कारण ते आपणाहून बलाढय आहेत. त्यांच्यापुढे आम्ही स्वतःच्या दृष्टीने नाकतोड्यांसारखे दिसलो."

98 परंतु यहोशवाने काय केले? त्याने लोकांना शांत केले. तो म्हणाला, "तुम्ही थांबा, आपण कितीही थोडके असलो तरी तो देश जिंकण्यास आपण पूर्णपणे समर्थ आहोत." तो काय करीत होता? तो वचनावर सत्याने उभा राहीला होता, "मी तुला हा देश दिला आहे," पण त्याचा प्रत्येक इंच लढून घे.

99 आई, तु ह्यावर विश्वास ठेवते का? देवाने तुला तुझे आरोग्य देले आहे, परंतु तुला ते लढून घ्यावे लागेल. "ज्या ज्या ठिकाणी तुमचे पाऊल पडेल ते ते ठिकाण मी तुम्हाला दिले आहे." *पाऊलखूणा* म्हणजे "मालकी." ते सर्व तुझे आहेत, प्रत्येक अभिवचन तुमचे आहे, पण प्रत्येक इंचासाठी तुम्हाला ते लढून घ्यावे लागेल.

100 आता, यहोशवाला ठाऊक होते की देवाने काय सांगितले. तो अब्राहामाची संतती होता, पाहा? तो म्हणाला, "मी विश्वास करतो की, देवाने तो देश आम्हाला दिला आहे आणि आपण तो जिंकून घेण्यास पूर्णपणे समर्थ आहोत." आणि तो परीक्षेत टिकून राहिला, इस्त्राएलाच्या सर्व समूहाविरुद्ध, सर्व वंशज आणि लोक ज्यांनी शोक केला व रडले. यहोशवा बोलला, "शांत राहा! देवाने अभिवचन दिले आहे."

101 ह्याने काहीच फरक पडत नाही कि, तुम्ही किती मोठे आहात, आणि तुमच्या विरोधात कोण आहे, आणि डॉक्टरने काय सांगितले देवाने वचन दिले आहे. ते पूर्ण करणे देवाकडे आहे.

102 त्याने काय केले? जेव्हा ते यार्देन नदीकडे आले आहे, त्याने फाटक काबिज केले. तेच त्याने केले.

103 यरीहो, पूर्णपणे बंदिस्त जणूकाही कासव आपल्या कवचामध्ये. त्यांने काय केले? त्याने ते फाटक काबीज केले.

104 एक दिवस जेव्हा त्याचा शत्रू त्याच्यावर चढाई करून आला त्याने त्याच्या शत्रूचे फाटक काबीज केले, इथपर्यंत की त्याने सूर्यास आज्ञा केली की तू स्थिर हो. आणि सूर्याने त्याची आज्ञा मानली, आणि सूर्य आकाशाच्या मधोमध सुमारे एक संपूर्ण दिवस थांबला.

105 देव त्याच्या वचनाशी प्रामाणिक राहतो, त्यासाठी त्याला काहीही का करावे लागेना; आकाश नाहीसे होईल परंतु त्याचा शब्द तो पडू देत नाही. त्याने असे वचन कधीच दिले नाही जे तो पाळू शकत नाही. "मी तो परमेश्वर आहे, जो तुझे सर्व रोग बरे करतो. जर विश्वासणाऱ्याने आजाऱ्यावर हात ठेवले, तर ते बरे होतील." आमेन. "विश्वासणाऱ्याना सर्व गोष्टी शक्य आहेत."

106 यहोशवाने विश्वास ठेवला, देवाने पृथ्वी फिरण्यपासून थांबवली. ती त्याने दूसरी शक्तीने तेथेच थांबून ठेवली, त्याचा स्वतःच्या सामर्थ्याने; पृथ्वी चोवीस तासासाठी हलली नाही, यहोशवाने त्याच्या शत्रूवर जय मिळवेपर्यंत. त्याने फाटक काबीज केले. खचितच त्याने केले. देव सदैव खरा आहे.

107 मला वाटते आपल्याकडे वेळ असता की आपण आणखी नायकांबद्दल पाहू शकलो असतो, पण माझ्याकडे फक्त दहा मिनीटेच आहेत. पहा, हे सर्व मौल्यवान नायक, कारण ते विश्वासाविषयीचे महान योद्धे होते, ते सर्व मरणाच्या फाटकाशी मेले. ते सर्व नाश पावले, अगदी मृत्युच्या फाटकापाशी.

108 नंतर अब्राहमची राजकीय संतती आली. ते सर्व इसहाकाची नैसर्गिक संतती होती. परंतु येथे अब्राहामाची राजकीय संतती, जो ख्रिस्त होता, अब्राहामाची विश्वासाव्दारे आलेली संतती, जे आपण असायला पाहिजे, पाहूया आपण आहोत की नाही. नैसर्गिक संतती ही फक्त वास्तविकता होती. इतर सर्व नैसर्गिक जन्माव्दारे जन्मले होते, पण तो कुमारीपासून जन्मला. पाहा, त्यामुळे, तो एक यहुदी, म्हणजे अब्राहामाची संतती नव्हता. तो अभिवाचानावरील विश्वासाच्या बिजांतून आला. आणि म्हणूनच आपणही त्याच्याव्दारे त्याची लेकरे आहोत.

109 पाहा त्याने काय केले. जेव्हा तो पृथ्वीवर होता, त्याने शत्रूचे प्रत्येक फाटक जिंकले आणि हस्तगत केले; राजकीय संतती. त्याने शब्दाव्दारे वचन दिले. त्याने ते जिंकले. त्याने, आपल्यासाठी, आजाराच्या फाटकावर विजय मिळविला. तेच करण्यासाठी तो आला होता. त्याने आजारी माणसांची आठवण केली, त्याने त्या फाटकावर विजय मिळविला. तुम्हाला ते जिंकवयाचे नाही; त्याने ते जिंकले. दुसऱ्या माणसांना त्याचे स्वतःचे फाटक जिंकावयाचे आहे. पण तुम्हाला ते जिंकावयाचे नाही, ते अगोदरच त्याने जिंकले आहे. त्याने आजारपणाचे फाटक जिंकले. आणि आजाराचे फाटक जिंकण्यासाठी त्याने काय केले असेल, जसे त्याने म्हटले की तो करील? "तुम्ही पृथ्वीवर जे काही मागाल, आणि पृथ्वीवर जे काही बांधाल, ते तो स्वर्गात बांधील," आपल्याला फाटकाच्या चाव्या दिल्या.

110 त्याने वचनाद्वारे मोहाच्या फाटकावर विजय मिळविला. आणि त्या चाव्या होत्या, “सैतानाला अडवा आणि तो तुमच्यापासून पळून जाईल.” त्याने त्या सर्वांवर विजय मिळविला; प्रत्येक आजारावर विजय मिळविला.

111 त्याने मृत्यूवर जय मिळविला, आणि त्याने अधोलोकावर जय मिळविला. त्याने मृत्यू व अधोलोक जिंकले. त्याने ते जिंकले जे इतर जिंकू शकले नाही, कारण ते देहस्वभावानुसार जन्मेलेली संतती होती. हा तर आत्मिक संतती आहे. त्याने कबरेच्या फाटकावर विजय मिळविला, आणि आपल्याला नीतीमत्व देण्यासाठी, तो तिसऱ्या दिवशी उठला.

112 “आणि आता आपण विजेत्यापेक्षा अधिक आहोत.” आपण फक्त वारसा हक्काने पुढे चालत आहोत, “विजेत्यापेक्षा अधिक.” आता आपण एका पराभूत झालेल्या शत्रूशी व्यवहार करीत आहोत. आजारपण हरलेले आहे. मृत्यू हरलेला आहे. नरक हरलेले आहे. सर्वांचा पराजय झालेला आहे. अरे बापरे! तर आता मी दुप्पटीने वाढलो आहे असे वाटत आहे मला दुप्पटीने अधिक चांगले वाटत आहे. आपण एका अशा शत्रूबरोबर लढत आहोत ज्यावर विजय मिळविला आहे.

113 ह्यात आश्चर्य नाही कि पौल म्हणू शकतो, जेव्हा ते त्याचे शीर उडविण्यासाठी शिरच्छेदाचा ठोकळा बांधीत होते, तो म्हणाला, “अरे मरणा, तुझी नांगी कोठे आहे? तू मला कोठे वळण्यास आणि किंचाळण्यास लावशील. कबरे, तुझा विजय कोठे आहे, आणि तुला वाटते की तू मला तेथे साच्यात घालून ठेवशील? मी तुला तेथे एक रिकामी कबर दाखवीन, आणि मी त्याच्यामध्ये आहे, तो मला शेवटल्या दिवशी उठवील.” एक हरलेला शत्रू!

114 आता आब्राहामाचे राजकीय बीज! देहस्वभावाच्या बीजाचा त्याच्याशी काही संबंध नाही. कारण तो आपल्या अगोदर गेला आहे आणि प्रत्येक फाटक आपल्यासाठी जिंकले आहे. तो आता दोन हजार वर्षांनंतर एक सामर्थी विजेता म्हणून आपल्यामध्ये उभा आहे. त्याने केवळ आजारपणच जिंकले नाही...त्याने आजारपण जिंकले. त्याने मोह जिंकला. त्याने प्रत्येक शत्रूवर जय मिळविला. त्याने मृत्यू जिंकला. त्याने अधोलोक जिंकले. त्याने कबरेवर जय मिळविला आणि तो पुन्हा उठला. आणि दोन हजार वर्षांनंतर येथे ह्या दुपारी तो आमच्यामध्ये उभा आहे, स्वतः सामर्थी विजेता म्हणून स्वतःची ओळख देत आहे! आमेन तो आजही जिवंत आहे, त्याचे वचन प्रकट करीत आहे, अब्राहामाचा राजकीय वंश! अरे बापरे! आणि शत्रू...

115 “तो त्याच्या शत्रूच्या फाटकावर विजय मिळवील.” त्या बीजास, स्वतःला, प्रकट करण्यासाठी तो येथे जीवंत उभा आहे कोणासाठी? ते पुर्वनियोजीत बीज, जे ते पाहू शकते. त्याने त्यावर विजय मिळविला. कोण, जे वचनाद्वारे पारखले गेले, ते पवित्र आत्म्याद्वारे ख्रिस्ताच्या शरीरात मूद्रित केले होते, त्यांच्यासाठी प्रस्थापित होते (काय?) इब्री 13:8 ते तसे आहे. ते पवित्र आत्म्याद्वारे मूद्रित करण्यात आले, तो पवित्र आत्मा...जो अब्राहामाने दूरून पाहिला; विश्वासाने त्याने त्यावर भरवसा ठेवला. आणि आता आपल्याला तो मिळाला आहे, त्याने दिलेल्या अभिवचनाकडे पाहून तो काय म्हणत आहे. आणि योहान 14:12 ह्या शेवटल्या दिवसांत, पुनरुत्थित झालेल्या विजेत्याद्वारे, प्रस्थापित झाले आहे.

116 कुठली व्यवस्था नाही; परंतु एक व्यक्ती, ख्रिस्त, तो महाविजेता. माझी कलीसीया नाही, माझे बाप्टिस्ट चर्च नाही किंवा तुमचे प्रेसबिटेरियन, मेथडिस्ट, किंवा पेनटेकोस्टल, त्याच्याव्दारे नाही, पण येशू ख्रिस्ताव्दारे. तो आज जिवंत आहे. तो उठला आपल्याला नीतीमान ठरविण्यासाठी.

117 आणि तो जिवंत आहे, म्हणून तो म्हणाला आम्हीही जीवंत राहू. “मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, परंतु देवाच्या मुखांतून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल.” केवळ वचनाचा भाग नव्हे, “प्रत्येक वचन जे देवाच्या मुखांतून निघते.” “मीच पुनरुत्थान व जीवन आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल. आणि जिवंत असलेला प्रत्येकजण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही. हे तू खरे मानतेस काय?” शत्रूचे प्रत्येक फाटक काबीज कर!

118 बोसवर्थला कसा जिंकू शकला, जेव्हा देव...बोसवर्थ जिंकणाऱ्यामध्ये होता. आणि हेच कारण आहे की तो म्हणाला, “माझ्या जीवनाचा सर्वात आनंदाचा क्षण आता आहे.” हा हा. तो त्या सामर्थ्यशाली विजेत्याला ओळखतो. त्याची खात्री त्याच्याबरोबर आहे. ओह माझ्या! आता आपण गाऊ शकतो;

> जिवंतपणी त्याने माझ्यावर प्रेम केले; मरणाने, त्याने माझे तारण
> केले.;
> पूरण्याने, त्याने माझी पापे वाहून दूर नेली;
> उठण्याने, त्याने सर्वकाळासाठी नीतीमान ठरविले;
> एके दिवशी, तो येत आहे, तो अदभूत दिवस!

119 ज्यांना असे वाटते ते हरलेले आहेत. एडी पेरोनेट मी ते विश्वास ठेवतो की, तो त्याची ख्रिस्ती गाणी विकू शकला नाही. कोणालाच ते नको होते. त्यांना त्याच्याशी काही कर्तव्य नाही. ओह हरलेला, आणि एक विश्वासी! एके दिवशी, पवित्र आत्मा त्याच्यावर आला. त्याच्या शत्रूचे फाटक, जे त्याचे साहित्य स्विकारत नव्हते! आत्म्याने त्याला पकडले, आणि त्याने पेन पकडला, देवाने त्याला हे स्वागताचे गाणे लिहीण्यास प्रेरित केले.

> येशूच्या गौरवी नावातील सामर्थ्य!
> दुतसुध्दा साष्टांग नमस्कार करीत;
> राजकिय मुकुट घेऊन या,
> आणि सर्वांच्या वरती मुकुटधारी प्रभू.

120 एकदा, अंध फॅनी क्रॉसबाय म्हणाली, “ते तुमच्यासाठी काय आहे?” काही...तिने तिचा ज्येष्ठपणाचा अधिकार विकला नाही, जसा पॅन्टेकोस्टल एल्वीस प्रीस्लीने केले, किंवा चर्च–ऑफ–क्राईस्ट च्या बून ह्याने केले. किंवा रेड फोले ह्याने केले, त्यांनी आपले गुणविशेष जगाला विकले; त्यांना वेगवान कॅडीलेकस् आणि लाखो डॉलर्स सुवर्णाची बक्षिसे मिळाली. परंतु, फॅनी क्रॉसबाय आपल्या जागेविषयी सत्याने उभी राहिली. तीने आरोळी केली:

> मला सोडू नको, ओ तारणदात्या,
> माझ्या काकुळतीच्या शब्दाकडे कान दे;
> तू दूसऱ्यांना बोलवीत असता,
> मला विसरू नको.
>
> तू सर्व सुखांचा स्त्रोत आहेस,
> जीवनापेक्षा माझ्यासाठी अधिक आहे.
> तुझ्याखेरीज ह्या पृथ्वीवर मला कोण आहे?
> किंवा स्वर्गात कोण आहे, परंतु तूच?

121 ते म्हणाले “जर तू स्वर्गात जातेवेळी जर आंधळीच राहीलस तर काय होईल?”

ती म्हणाली, “मी त्याला कसेही ओळखीन.”

म्हणाले, “तू त्याला कशी ओळखशील?”

म्हणाली, “मी त्याला ओळखीन.”

ते म्हणाले, “मिसेस, क्रॉसबाय, तू लाखो डॉलर्स कमवू शकतेस.”

ती म्हणाली, “मला लाखो डॉलर्स नकोत.”

122 “तू त्याला कसे ओळखशील?” ती म्हणाली:

> मी त्याला ओळखीन, मी त्याला ओळखीन,
> आणि मुक्त झालेली अशी त्याच्या बाजूला उभी राहीन;
> मी त्याला ओळखीन, मी त्याला ओळखीन.

123 “जर मी त्याला बघु शकली नाही, त्याच्या हाताच्या नखाच्या स्पर्शाने मला त्याची जाणीव होईल.” तिने तिच्या शत्रूचे फाटक जिंकले होते. होय.

124 जर तूम्ही ख्रिस्तामध्ये आहात! तो म्हणाला, “तुम्ही माझ्यामध्ये राहिला, व माझी वचने तुम्हांमध्ये राहिली तर जे काही तुम्हाला पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हाला प्राप्त होईल; मागा कुठले फाटक तुम्ही जिंकू इच्छिता. तुम्ही जे काही मागाल, आणि ते तुम्हाला दिले जाईल. जर तुम्ही माझ्यामध्ये, आणि माझी वचने तुम्हामध्ये, तुम्हापुढे येणाऱ्या कुठल्याही शत्रूचे फाटक तुम्ही काबीज करू शकाल.” तुम्ही अब्राहामाचे राजकीय वंशज आहात.

125 तुमच्यापुढे कुठल्या प्रकारचे फाटक उभे आहे? जर ते आजारपण आहे, तुम्ही ते जिंकण्यास समर्थ आहा. तेव्हा आपण गाणे गाऊ शकतो, ते आनंददायक जुने गाणे गाऊया:

> ह्या पुस्तकातले प्रत्येक वचन माझे आहे,
> प्रत्येक अध्याय, प्रत्येक वचन...आणि ईतके दैवी,
> माझा त्याच्या ईश्वरी प्रेमावर भरवसा आहे,
> ह्या पुस्तकांतील प्रत्येक वचन माझे आहे.

126 आपण एका विजेत्या पेक्षा अधिक आहोत, आणि अब्राहामाचे संतान शत्रूंचे फाटक काबीज करील! जेव्हा ते म्हणतात ह्या गोष्टी होऊ शकत नाही जेव्हा ते त्यास सैतान किंवा बालजबूल म्हणू इच्छितात किंवा असेच काहीतरी, देव खात्रीपूर्वक प्रत्येक फाटक जिंकण्यास आणि शत्रूवर विजय मिळविण्यास समर्थ आहे.

आपण प्रार्थना करूया.

127 प्रभो, अब्राहामाचे संतान हे करो...मला ठाऊक आहे ते हे पाहतील, प्रभो. ते वचन खऱ्या जमिनीला हादरविल्याशिवाय, त्यात कसे पडू शकेल? मी प्रार्थना करितो कि ते आता समजतील. प्रत्येक मनुष्य जो प्रार्थना रांगेत आला आहे, त्यास आरोग्य मिळो.

128 प्रभो, जर येथे अजुनही असे कोणी असतील, ज्यांनी अजून त्यांच्या पापाची कबुली दिली नसेल, सर्वांसमोर उभे राहिले नसतील आणि ख्रिस्तासाठी उभे राहिले असतील, सर्व रितीरिवाज आणि त्या थंड, औपचारिक, निर्जीव गोष्टी त्यांना तुझ्यापासून दूर घेऊन गेल्या आहेत, त्या नाकारायला तयार आहेत. आणि ते आता उभे राहू देत आणि म्हणोत, “मी त्याला माझा तारणारा म्हणून स्विकारीन.” मग तू त्यांच्यासाठी त्या दिवशी उभा राहशील.

129 आपण आपल्या माना झुकविलेल्या असताना जर तेथे कोणी आहेत ज्यांना प्रार्थनेसाठी उभे राहायचे असेल ते म्हणोत, “मी त्याच्यासाठी आता उभे राहू इच्छितो

ह्यासाठी की तो माझ्यासाठी त्या दिवशी त्याच्या दैवी समक्षतेत उभा राहील." मी तुझ्याकडे विनंती करतो, आणि मी तुम्हाला सुसंधी देतो की जर तुम्ही उभे राहाल तर तुमचे नाव जीवनाच्या पुस्तकात लिहीले जाईल. मी तुम्हाला कुठल्याही मंडळीत जाण्यास सांगत नाही, मी तुम्हाला ख्रिस्ताकडे येण्यास सांगत आहे, जर तुम्ही येथे आहात आणि त्याला ओळखत नाही.

130 मुला, परमेश्वर तुला आशीर्वादीत करो. तेथे अजून कोणी आहे का जो म्हणेल, "मी—मी आता उभा राहू इच्छितो." बहिणी परमेश्वर तुला आशीर्वादित करो: परमेश्वर तुला आशीर्वादित करो, माझ्या बहिणी. "मी उभा राहू इच्छितो..." परमेश्वर तुम्हाला आशीर्वादित करो. परमेश्वर तुला आशीर्वादित करो. "मी आज ह्या दुपारी उभे राहू इच्छितो." हे चांगले लोक, पुरुष आणि स्त्रीया उभे राहत आहे, "मी आज ह्या दुपारी माझी भुमिका घेतो."

131 आणि त्या दिवशी जेव्हा डॉक्टर म्हणेल, "बरे, अपघात झाला आहे; त्याचे रक्त जात आहे, मृत्यू त्याच्याजवळ आहे, किंवा तिच्यावर आहे." किंवा एका सकाळी, तुम्हाला तुमच्या भूमिकेची आठवण होईल. तुम्ही आता त्याच्यासाठी उभा राहिला आहात.

132 "जर तुम्ही माणसांसमोर माझी लाज धराल तर मीही तुमची लाज माझ्या पित्यासमोर आणि पवित्र देवदूतांसमोर धरीन. पण जर, तुम्ही मला माणसासमोर पत्कराल, मीही तुम्हाला माझा पिता व पवित्र देवदूतांसमोर पत्करीन."

133 बहिणी देव तुला आशीर्वादित करो. तेथे काही जण बाल्कनीत असतील? ह्यासमयी, जेव्हा आम्ही वाट पाहत आहोत. काहीजण, बहुतेकजण मुख्य मजल्यावर? ठीक आहे. मित्रा, मी तुझ्या शब्दावर विश्वास करतो.

134 जर देवाचे वचन सुपीक जमिनीवर पडले, जसे विहीरी जवळील ती स्त्री, ती — तीला समजले. जगाच्या स्थापने...स्थापनेअगोदर स्वर्गात तीला प्रतिनिधीत्त्व मिळाले होते. जेव्हा प्रकाश तिजवर पडला तीने ते ओळखले.

135 माझ्या भावा, देव तुला आशीर्वादित करो. ते धाडस आहे...माझ्या भावा, देव तुला आशीर्वादित करो. तू तुझ्या जीवनात महान गोष्टी केल्या असतील; तू आता सर्वात महान गोष्ट, आतापर्यंत केलेल्या सर्व गोष्टींमध्ये, करीत आहेस ती म्हणजे ख्रिस्तासाठी उभे राहणे.

136 आमच्या स्वर्गीय पित्या, आजच्या दुपारी बीज काही जमिनीवर टाकण्यात आले आहे. आपण पाहतो जीवनाचा बहर येत आहे. पुरुष व स्त्रीया त्यांच्या पायांवर उभे राहत आहेत, सगळे देवाचे डोळे पाहत आहेत, जो सर्वव्यापी, सर्वसाक्षी, सर्वज्ञानी, त्यांना पाहत आहे. हे पित्या ते तुझे आहेत. मी तुला ते, आता बक्षिस म्हणून सादर करीत आहे.

137 हा आता येथे उभे राहण्याचा त्यांचा अनुभव समजून, कि त्यांनी काय केले आहे, ह्याचा अर्थ काय आहे, ते उभे राहिले ह्यासाठी जे प्रभूचा तिरस्कार करतात त्यांना उभे करण्यासाठी. ते तुझ्या समक्ष उभे राहण्याच्या दिवसापर्यंत तुझ्याशी प्रामाणिक राहोत, मग त्या दिवशी ती प्रेमळ वाणी त्यांना म्हणेल, "हो, एक दिवस बॅटन रग मध्ये, किंवा 'डॅन्ह्म स्प्रींगस नावाच्या लहानशा जागी तो माझ्यासाठी उभा राहिला, पित्या, आता, मी त्याच्यासाठी उभा राहीन किंवा तिच्यासाठी." प्रदान कर, पित्या. ते तुझे आहेत, येशूच्या नावात. आमेन.

ह्या तुमच्या निर्णयाबद्दल देव तुम्हास आशीर्वादित करो. देव कधीच...

138 आता माझ्यासाठी हि एक गोष्ट करा. पाहा, जर तुमचे पाळक आजूबाजूला असतील तर त्यांच्याशी बोला. जर तुमचा अजूनपर्यंत बाप्तिस्मा झाला नसेल, ख्रिस्ती बाप्तिस्मा, तर तसे करा. आता तुम्ही विश्वासणाऱ्यांमधले व्हा, खरे विश्वासी, बनविलेले विश्वासी नव्हे; खरे विश्वासी.

आपण प्रार्थना करित असताना, या रुमालांसाठी प्रार्थना करूया.

139 स्वर्गीय पित्या, हे रुमाल आता बाहेर जात आहेत; कुठे, मला ठाऊक नाही. कोठे तरी दलदलीच्या प्रदेशात एखादा म्हातारा आंधळा वडील बसून, हा रुमाल येण्याची वाट पाहत असेल; लहान बाळ तेथे दवाखान्यातील बिछान्यावर पडून; एखादी आई उभी राहून, हा रुमाल परतण्याची आतुरतेने वाट पाहत असेल. स्वर्गीय पित्या, मी तुझकडे प्रार्थना करितो की, तू त्यांच्याबरोबर जा. आणि आज तुझ्या उपस्थितीचे प्रतीक म्हणून आणि आमचा तुझ्यावरील विश्वास, कारण आज आम्हासाठी तुझे वचन प्रचार केले गेले आहे, तो विश्वास जो अब्राहामामध्ये होता, आणि तो विश्वास जो निर्माण केला गेला आणि येशू ख्रिस्ताद्वारे आम्हाला दिला गेला, तो ह्या रुमालांबरोबर जावो. आणि त्या प्रत्येकाला आरोग्य मिळो ज्यांच्यावर हे रुमाल ठेवले जातील. आम्ही त्यांना येशू ख्रिस्ताच्या नावाने पाठवितो. आमेन.

140 आता थोडा वेळ, आपण प्रार्थना रांग बोलवण्याअगोदर सर्वज्ञानी आणि सामर्थ्यशाली परमेश्वर, महान देव, सर्व भरपूरी देणारा…कृपया मित्रांनो, मी—मी आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यास सुरु करणार आहे, आणि मी…कदाचित, जेव्हा मी खाली येईन—मला तुम्हाला काही सांगता येणार नाही; काहीजण त्या अगोदरच जातील. तुम्ही कोणीही असाल जर तुम्ही काही वेळासाठी उभे राहिला नाहीत, आणि तुम्हाला खात्री नसेल…

141 जर तुम्ही एका मंडळीचे सभासद आहा, ती चांगली गोष्ट आहे, परंतु ती पुरेशी नाही. पाहा, तो श्रीमंत तरूण एका मंडळीचा सभासद होता. पाहिले? त्याने येशूला विचारले सार्वकालिक जीवन हे वतन मिळण्यास मी काय केले पाहिजे. त्याने ते स्विकारले नाही. तो निघून गेला. त्या तरूण मनुष्याला हे करणे मुर्खपणाची गोष्ट वाटली. त्याच्यासारखे करू नका. तुम्हाला ठाऊक आहे त्याची ओळख झाली होती? थोडयाच अवधीत, त्याची भरभराट झाली. तो श्रीमंत झाला. त्याची धान्याची कोठारे भरली. त्याचे उत्पन्न साठवावयास जागा नव्हती. परंतु नंतर आपण पाहतो त्याची शेवटची अवस्था, नरक, अग्नीज्वालेत यातना भोगत जळावे लागले. तुमच्या बाबतीत तसे होऊ देऊ नका. ख्रिस्ताला स्विकारा.

142 तुम्ही तरुणांनो, तुम्ही तरूण मुलींनो, तरूण मुलांनो, तुमचे जीवन बदला, कृपया ते करा. माझे ऐका, तुमचा—तुमचा भाऊ म्हणून, जो तुमच्यावर प्रेम करतो. मी येथे आहे कारण मी तुमच्यावर प्रेम करतो. मी देवावर प्रेम करतो, आणि मी तुमच्यावर प्रेम करतो, आणि मी देवावर प्रेम करू शकत नाही, जर मी तुमच्यावर प्रेम करीत नाही.

143 मला हे आवडेल जर तुम्ही काही टिप्पणी कराल, ती माझ्या मुलाकडे किंवा माझ्या एखाद्या मुलाकडे द्या. मला केवळ…मी, मी त्या शिवाय जाईन. कोणीही पालक ते करील; तसेच देवही करेल, पाहा? त्याच्या लोकांवर प्रेम करा. एकमेकांवर प्रेम करा.

144 तुम्ही म्हणाल, "तू त्यांच्यावर का रागावून बोलला?" खरे प्रेम, सुधारणा करणारे असते.

145 जर तुमचा मुलगा बाहेर रस्त्यावर बसत आहे; तुम्ही म्हणाल, "बरे, तेथे छोटू बसला आहे. त्याने ते करायला नको आहे, परंतु मी त्याच्या लहान भावना दुखवू इच्छित नाही." तुम्ही त्याच्यावर प्रेम करीत नाही. तो तेथे मारला जाईल. जर तुम्ही त्याच्यावर प्रेम

करता, तर तुम्ही त्याला आत आणाल आणि त्याला थापट दयाल. तुम्ही त्याला आज्ञा पाळण्यास लावाल.

146 अशाप्रकारे देव करतो. प्रेम सुधारणूक करणारे आहे आणि तेच खरे प्रेम आहे.

147 जेव्हा एखादा प्रचारक उभा राहतो आणि तुम्हा स्त्रीयांना केस कापू देतो आणि चेहरे रंगवू देतो आणि अशाच गोष्टी, आणि तुमची सुधारणा करीत नाही, तेथे खरे प्रेम नाही; आणि ते बाहेर बोलवत नाही. आणि तुम्हा पुरुषांना तीन चार वेळा लग्न करू देतो, आणि अशाच सर्व इतर गोष्टी, आणि त्या गोष्टी चालू देतो, तेथे खरे प्रेम नाही. तुम्हाला मंडळीत सदस्यत्व देतो, आणि पाठीवर शाबासकी देतो, आणि काही तत्वाने तुम्हाला दाबून टाकतो, मग, "तुम्हाला हेच केले पाहिजे, पवित्र मंडळीत जा." तेथे प्रेम नाही. किंवा, एकतर तो मनुष्य स्वतः इतका पूर्णपणे हरवला आहे, तो काहीच पाहत नाही.

148 खरे प्रेम सुधारणा करणारे असते, आणि तुम्हाला देवाच्या वचनाकडे परत आणते.

149 येशूकडे पाहा, कसे, तो काय म्हणाला कारण त्याने त्यांच्यावर इतके प्रेम केले की तो त्यांच्यासाठी मृत्यू पावला, जेव्हा ते त्याचे रक्त मागत होते.

150 आता तो महान पवित्र आत्मा...मी थोडया वेळासाठी थांबू इच्छितो. आपण सुरु करण्याआधी माझ्यावर पवित्र आत्म्याच्या अभिषेक होईपर्यंत मी थांबत आहे. मी प्रचार करीत आहे. तुमच्या सहकार्याबदल धन्यवाद.

151 आता, इथे असलेले प्रत्येक जण, तुम्ही कोठेही असा, ह्या ईमारतीत कोठेही असाल, थोडया वेळासाठी प्रार्थना करा, सांगा, "प्रभू येशू, मला सहाय्य कर! मला सहाय्य कर! मला तुझ्या कपड्यांना स्पर्श करू दे." येशू म्हणाला, तुम्हाला माहीत आहे, जेव्हा एक स्त्री त्याच्या वस्त्राच्या गोंड्याला शिवली, त्याला ते कळले नाही, परंतु जेव्हा तो बाजूला वळला आणि त्याने ओळखले ती कोण आहे आणि तीने काय केले. ह्या दुपारी तो तोच येशू आहे, त्या महायाजकाला स्पर्श करू शकतो आपल्या अशक्त भावनेद्वारे.

152 तुम्ही प्रत्येकजण आता विश्वास करता का, ते सत्य आहे, देवाने हे अभिवचन दिले आहे, पुन्हा एकदा (आणि ते तो दाखवो) आपण सदोमाच्या दिवसात राहत आहोत? ह्यावर ह्या इमारतीतील कितीजण विश्वास ठेवतात, तूमचे हात फक्त वर करा.

153 आपण जसे सदोमाच्या दिवसात होते त्या दिवसात राहत आहोत. पूर्ण कार्यप्रणाली दूषित झाली आहे, जगाची कार्यप्रणाली, सर्व गोष्टी, मंडळीची कार्यप्रणाली, राजकारणाची कार्यप्रणाली. तेथे काहीच नाही. राजकारण इतके भ्रष्ट झाले आहे. सर्व ठिकाणी कार्यप्रणाली आपले हुकूमशहा सर्वत्र भ्रष्टता आहे. मंडळीचीही स्थिती तशीच आहे. कुटुंबही तसेच झाले आहे. ते फक्त भ्रष्टता आहे, सदोम!

154 तर, लक्षात ठेवा देवाला हे अगोदरच माहित होते, मग लक्षात घ्या तो म्हणाला तो स्वतःला मनुष्य देहात प्रकट करील, आणि त्याने सदोमासमोर तसेच केले, अभिवचनाची संतान ह्या जगात येण्याअगोदर. त्याने अभिवचन दिले होते की तो एकाला, ती अभिवचनाची संतान येण्याअगोदर पाठवील, जसे त्याने पहिल्या वेळेस केले, ते ओळख देईल; आणि तो म्हणाला, "जेव्हा मनुष्याचा पुत्र प्रगट होईल."

155 मी तुला ओळखत नाही. श्रीमती. थाँमसन, तुला स्त्रीयांची समस्या आणि आजार आहे, तू विश्वास ठेवतेस का देव तुला बरे करील? तू विश्वास करू शकतेस काय? तू करशील का? श्रीमती., श्रीमती. थाँमस, तू विश्वास ठेवतेस का की तो तुला बरे करील? तूझे हात वर कर.

156 तेथे तूझ्यामागे एक बसली आहे. ती प्रार्थना करीत आहे. तिला संधीवात झाला आहे.

157 एक जी तीच्या बाजूला बसली आहे, तिला पोटाची समस्या आहे, प्रार्थना करीत आहे. तू हे चुकवशील, तू पाहत नाहीस. तू येथली नाहीस. तू मिसीसीपीहून आली आहेस. तुम्ही श्रीमान आणि श्रीमती क्रेमर आहात. जर तुम्ही पूर्ण अंतकरणापासून विश्वास कराल, येशू ख्रिस्त तुम्हाला बरे करील. जर तुम्ही ह्यावर विश्वास ठेवू शकता. तुम्ही करता का? तर तुम्ही ते प्राप्त करू शकता. ठीक आहे. तुम्ही तुमचे हात वर करा म्हणजे लोक तुम्हाला पाहू शकतील कि तुम्ही तेच आहात.

158 मी ह्या लोकांना ओळखत नाही, त्यांना मी माझ्या आयूष्यात कधी पहिले नाही. तुम्हाला विश्वास ठेवावा लागेल, मित्रा. तो स्वतःची ओळख देत आहे. तुम्ही तुमच्या पूर्ण अंतकरणाने विश्वास ठेवता काय? (मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.)

159 महाशय, तुम्ही आपले डोके का हालविले आणि माझ्याकडे असे का पाहत आहात? होय, महाशय. कारण तुम्ही ते केले, मी एक मिनीट तुमच्यांशी बोलणार आहे. तुम्ही एक वयस्कर, सभ्य तेथे बसलेले आहा, माझ्याकडे बघत आहात. त्याने माझ्याकडे इतक्या प्रामाणिकपणे पाहिले. त्याने विश्वास ठेवला आहे. तू कोणा एकासाठी प्रार्थना करीत आहेस, ज्याला तडाखा बसला होता. परंतु—परंतु एका महत्त्वाच्या गोष्टीसाठी तू प्रार्थना करत आहेस, तुला गरज आहे, तू पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याचा शोध करीत आहेस. ते बरोबर आहे. ऊ–हु. ते खरे आहे. जर तू ह्यावर विश्वास ठेवते! ती बाई, तू नोकरीच्या शोधात आहेस. त्या खेरीज, तुला हे माहीत असेल की मी देवाचा संदेष्टा आहे, किंवा सेवक, तुझ्यावर दोन शस्त्रक्रिया झाल्या आहेत. त्यामुळे तुझ्यामध्ये अशक्तपणा राहिला आहे. ह्या सर्व स्थिती, आत्मिक समस्या. मी तुला सांगू इच्छितो त्या सर्व सुटल्या आहेत. तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे.

160 [ध्वनिफितीमध्ये रिकामी जागा—संपा.]...तुझ्या अगदी बाजूला बसलेली आहे. ती प्रार्थना करीत आहे. येथे पाहा. त्याने तुझी प्रार्थना ऐकली आहे, आणि तू त्याला स्पर्श केला आहे. मी तुला ओह्खीत नाही, पण तो ओळखतो. मी तुला सांगीन तू कशासाठी प्रार्थना करीत होती. तू अंतःकरणापासून विश्वास करतेस काय? तुला पित्त मूत्राशय समस्या आहे, तू प्रार्थना करीत आहेस. तू विश्वास करतेस का की देव तुला चंगाई देईल आणि तुला बरे करील? तू श्रीमती स्मिथ आहे. हे बरोबर आहे. तुझा हात वर कर.

161 पाहा, तो त्याची ओळख देत आहे. ते काय आहे? ते अब्राहामाचे बीज आहे, विश्वास जो अब्राहामामध्ये होता, प्रभू येशू ख्रिस्त आमच्या मध्ये आहे, त्याचे वचन दृढ करीत आहे, त्याच्या चिन्हाद्वारे.

162 कोण, किती पत्रांसाठी प्रार्थना करावयाची आहे, तुमचे हात वर करा, तुम्हाला पत्र मिळाले आहे का? ओह, आपण प्रार्थनेसाठी सुरुवात करू या.

163 तुम्ही पाहिले, तुम्हाला समजत आहे. नाही का? आता तो आत्मा फक्त...ते आरोग्यच देत नाही. तो येथे असल्याची फक्त ओळख देत आहे. तुमच्या पाळकांनाही अशाच प्रकारे आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्याचा अधिकार आहे. ते हे करीत नाहीत; नाही, खचितच नाही. परंतु त्यांना—परंतु त्यांना हाच अधिकार आहे, "विश्वासणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील."

164 आता माझी इच्छा आहे माझ्या पाळक मित्रांनी येथे यावे. [भाऊ ब्रॅन्हम कोणालातरी विचारतात, "सेवकांना प्रेक्षकांमधून बोलाविणे, हे बरोबर आहे काय?"—संपा.]

165 येथे किती पाळक आपल्या हृदयापासून विश्वास ठेवतात, येथे किती सेवक विश्वास ठेवतात? ओह, आभारी आहे. मला बरे वाटेल, जर तुम्ही उभे राहाल? येथे या,

माझ्याबरोबर थोडावेळ उभे राहा, येथे माझ्याबरोबर, आजाऱ्यांसाठी प्रार्थना करा. येथे या, आता तुम्ही पाहा चंगाई मिळते, काय होते पाहा.

166 तुम्ही येथे यावे असे मला वाटते, येथे एक—एक दुहेरी रांग तयार करा. मी तेथे खाली आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यास, काही वेळेतच येत आहे. मला असे विश्वासी पाळक हवेत जे आपण विश्वासी असण्याची ओळख देऊ इच्छितात. तुम्ही विश्वास ठेवता, तुम्ही येथे येत आहात, तुम्ही एक पवित्र, शुध्द जीवन जगत आहात. लक्षात घ्या, ह्यातून काय प्रगट होते कि, तुम्ही ख्रिस्ताचे शुभवर्तमान गाजवीत आहात!

167 भाऊ ब्लेअर, मला ठाऊक आहे की तुम्ही तेथे आहात किंवा भाऊ पॅट. तुम्ही तेथे दुहेरी रांग कराल का जसे तुम्ही नेहमी करता, जर तुम्ही कराल, तुम्ही आणि भाऊ पॅट.

168 विश्वासणारे पाळक जे विश्वास ठेवणारे आहेत! आता, पाहा, जर देव त्याची ओळख त्याच्या वचनाद्वारे देतो, त्याच्या वचनाद्वारे, किती जणांना माहीत आहे कि पवित्र शास्त्र, येशूने हे म्हटले, “विश्वास धारणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील. त्यांनी दुखणाइतांवर हात ठेविले म्हणजे ते बरे होतील”? पाळकांनो, तुम्ही येथे तुमची विश्वासी म्हणून ओळख देण्यासाठी आला आहात, हो ना? तुम्ही विश्वासणारे आहात, (नाही काय?), तुम्ही येथे उभे राहिले नसता. आता येशूने काय म्हटले? “विश्वास धरणाऱ्यांबरोबर ही चिन्हे असत जातील.” मी तुमच्याबरोबर एक विश्वासी आहे.

169 मी खाली येत आहे. हे आपले लोक आहेत, आणि आपण ह्या कळपाचे मेंढपाळ आहोत. मी खाली येत आहे, माझे हात तुमच्या हातात देत आहे, हे जाळे तुमच्यासह ताणित आहे. आणि जेव्हा हे लोक तुमच्याकडे येतील, जर तुमच्या मनात त्यांच्याविषयी लहानसा संशय असेल तर तो आताच काढून टाका; ह्यासाठी कि जेव्हा ही लोक येतील, त्यांच्यातील येणारा,प्रत्येकजण आणि आपण त्यांच्यावर हात ठेवू, त्यांना आरोग्य मिळेल. तुम्ही प्रत्येकजण ह्यावर तुमच्या पूर्ण अंतकरणाने विश्वास ठेवता का? [सेवक म्हणतात, “आमेन.”—संपा.]

170 येथे कितीजण दुसऱ्यांसाठी प्रार्थना करणार आहेत, जेव्हा ते येथून जातील, तुमचे हात वर करा, “मी प्रार्थना करीन.”

171 लक्षात ठेवा, ह्यांतील कोणी तुमचे वडील, तुमची आई, तुमची मुलगी किंवा मुलगा, बहीण किंवा भाऊ असेल. आणि जर तुमचे नसतील तर इतर कोणाचे असतील. जे ह्या रांगेतून येतील आणि काय होईल जर ते तुमचे असतील, आणि ते कर्करोगाने किंवा कुठल्यातरी भयंकर आजारांने मरत असतील, तर तुम्ही त्यांच्यासाठी गंभीरपणे प्रामाणिक राहणार नाहीत का? निश्चीतच, आपण राहू.

172 आता, मी विश्वास ठेवतो, तुम्ही कसे…आता हे *ह्या* रांगेत येथे, तसेच, *त्या* बाजूने उभे राहा, प्रार्थनापत्र बरोबर घेऊन. त्या बाजूला उभे राहा, जे सर्व उजव्या बाजूला आहेत. आता, डाव्या बाजूने राहा, आपण सगळे गर्दीत अडकलो आहे, तुम्ही पाहा, आणि तुम्हाला ठाऊक नाही, कसे आपण करीत आहोत. ठीक आहे, जे सगळे *ह्या* विभागात आहेत, *येथे* उभे राहा. आता जे सगळे उजव्या हाता कडील विभागात आहे, त्यांनी ह्या मार्गाने पुढे या; कारण तुम्ही खाली येत आहात.

173 आणि तुम्ही कसे जात आहात, ते कसे बाहेर जात आहे, भाऊ बॉर्डस? त्या बाजूच्या दरवाजाने जा, उजव्या बाजूने या आणि परत इमारतीत.

174 म्हणून जेव्हा *ही* रांग काही मिनिटात बोलवली जाईल आणि ते उभे राहतील. आणि आता आपण येथे पाहू…जे *ह्या* विभागात आहे, ते ठीक आहे, ह्या बाजूने फिरा.

तुमची प्रार्थनापत्रे पकडा, ह्या बाजूने चाला. आणि जे बाल्कनीत आहेत, त्यांनी हयांना भेटण्यासाठी रांगेच्या शेवटी तेथे चाला. आता हे जे डाव्या हातावरच्या विभागात आहेत, डाव्या बाजूला जा. आणि नंतर तुम्ही तुमची रांग बनवा आणि *तेथे* मागे जा, मागे वळा, *त्या* मार्गाने वळा. पाहा? आणि तुम्ही उजव्या बाजूच्या रांगेत जा, म्हणजे आपला इथे काहीच गोंधळ होणार नाही.

175 आणि नंतर जे वर बाल्कनीत आहेत, त्यांच्याजवळ जायच्या वाटेत जागा करा, आणि तेथे उभे राहा जसे ते त्यातून जातील.

176 आता, मागच्या बाजूने चालण्यास सुरुवात करा, प्रत्येक जण, मागे चाला येथे *ही* रांग मिळेपर्यंत. जरा उजवीकडे या, वर *येथे*, उजव्या बाजूने चालण्यास सुरुवात करा आणि *ह्या* रांगेपर्यंत या.

177 ओह, आता ह्यावेळेस काय घडू शकते! काय घडू शकते! हि अशी वेळ असणार आहे जेथे काहीतरी घडले पाहिजे. ठीक आहे.

178 आता, ते ठीक आहे, सरळ मागे जा *त्या* मार्गाने, आणि रांगेत राहा. सरळ ह्या वाटेने जा. आता तो मार्ग आहे.

179 आणि आता जेव्हा तुम्ही प्रत्येकजण आपल्या पायावर उभे आहात, आपण प्रार्थना करणार आहोत. आणि ही मंडळी माझ्याबरोबर प्रार्थना करणार आहे की तुम्ही बरे केले जाणार आहात. आता फक्त विश्वास ठेवा. आणि करू नका...

180 येथे ह्या सभोवती या, पाठी मागे, सभोवती या आणि ह्या रांगेत एकत्र या. उजव्या बाजूने या, मोठी रांग बनवा. *त्या* मार्गाने सरळ या, आणि एक रांग बनवा. ते बरोबर आहे.

181 प्रत्येकजण प्रार्थनेत राहा. खऱ्या विश्वासात राहा. फक्त गर्दीकडे पाहत राहू नका. लक्षात ठेवा, आपण—आपण प्रभू येशू ख्रिस्ताच्या, उपस्थितीने पूर्णपणे झाकलेले आहोत, आपल्यावर अवलंबून आहे की, त्याने जे काही आपल्यामध्ये त्याच्या शब्दावरील विश्वासाद्वारे केले आहे त्याचा सन्मान करावा.

182 ते चांगले आहे. आता ते चांगले होईल. मला वाटते ती रांग व्यवस्थित जात आहे.

183 आता जेव्हा ते सगळे उभे आहेत, ह्या इमारतीतील प्रत्येक व्यक्तीने त्यांचे मस्तक झुकवावे असे मला वाटते.

184 प्रभू येशू, ते लवकरच होईल. निर्णय आताच घेतला पाहिजे. आम्ही विश्वास ठेवतो का तू येथे आहेस? आम्ही तुझ्यावर प्रेम करतो काय? प्रभो, आम्ही जे काही तुजकडे मागणार आहोत त्यासाठी पुरेसा विश्वास आमच्यात आहे काय? ही लोक रांगेत उभे राहून स्वतःची ओळख देत आहेत. प्रभो ते व्यर्थ जाऊ देऊ नको. प्रभो ते येथून जात असता, प्रत्येकजण असा जाईल जसे ते ख्रिस्ताच्या जवळून जात होते, कारण आपल्याला ठाऊक आहे तो येथे आहे. आणि आपण प्रार्थना करूया की त्यांना त्यांचे आरोग्य मिळेल. माझी खात्री आहे कि काही आठवड्यात, हे लोक त्यांच्या पाळकांकडे जातील, स्त्रीया ज्यांना स्त्रीविषयक समस्या, पोटाचा त्रास, पुरुष मुत्राशय ग्रंथीच्या व्याधीने त्रस्त सर्व प्रकारच्या समस्या, बरे केले जाईल, म्हणतील, "तुला माहीत आहे, त्या गोष्टी मला सोडून गेल्या आहेत," कारण ते तुझ्या उपस्थितीत आहे. ते आता तुझ्याजवळ येवोत—आणि ते प्राप्त करोत ज्यासाठी तू मृत्यू पावला. ते अब्राहामाची संतती आहेत, आणि तू त्यांच्यासाठी विजय मिळविला आहे. ते येवोत आणि प्राप्त करोत जे तू त्यांना दिले आहे.

185 आणि सैताना, ह्या आठवड्यात तु उघडा झाला आहेस, तुला समजेपर्यंत की तू हरलेला आहेस. येशू ख्रिस्ताने तुझा कलवरीवर पराजय केला आहे. तो तिसऱ्या दिवशी

उठला, आम्हाला नीतीमान ठरविण्यासाठी, आणि आज तो आमच्यामध्ये उभा आहे. आणि आमचा विश्वास त्याच्याकडे पाहतो, आणि तुझ्यापासून किंवा तू काही केलेले आहे, त्यापासून दूर. ह्या लोकांना प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात सोडून जा.

186 ठीक आहे, रांग चालू करा. [भाऊ ब्रॅन्हम आणि सेवक आजाऱ्यांवर हात ठेवतात आणि रांगेत उभे असणाऱ्या सर्वांसाठी प्रार्थना करतात. ध्वनिफितीमध्ये रिकामी जागा—संपा.]

187 आपण तसे केले आहे जसे धन्याने करण्याची आपल्याला आज्ञा केली आहे. किती जण त्या रांगेतून गेले आहे, विश्वास ठेवतात ते बरे होणार आहेत, तुमचे हात उभारा. मी पण तुमच्याबरोबर आहे.

188 आपण तेथे काय करीत होतो, शेवटी, सेवकांचा समुह तेथे; त्यांच्यात कित्येकजण आजारी होते, मला ते ठाऊक आहे, ते त्यांची मंडळी एकत्र करण्याचा प्रयत्न करीत आहेत, ते आत आले की नाही. ते खरे मेंढपाळ आहेत. आणि पवित्र आत्म्याने मला सांगितले, "त्यांना एकमेकांचे हात धरण्यास सांग." आम्ही आपली अंतकरणे एकत्र जुळवितो, आणि आमची प्रार्थना एकत्र करतो.

189 येशू, त्यांनाही बरे कर. आणि त्यांना सामर्थ्यशाली मेंढपाळ बनव, प्रभूच्या वचनात बलवान कर.

190 भावाबहीणींनो, देव तुमच्या सर्व मनोकामना पूर्ण करो. तुम्ही तुमच्या सर्व दिवसांत त्याची सेवा करो, आणि देवाचे सामर्थ्य तुमच्या जीवनात असो, त्याच्या सुंदर लोकसमुहाची सेवा करण्यासाठी. येशू ख्रिस्त, जो आम्हाबरोबर आहे, आणि तो तुम्हा समवेत सर्वदा आहे, तो त्यास तुमच्यासाठी ह्यापूर्वी होता त्यापेक्षा अधिक प्रमुख होवो.

191 तुम्ही लोकहो, तुमच्यांतील काही असहाय्य आहेत; तुम्हाला आता थोड्या वेळासाठी काहीच फरक जाणवत नसेल, तुम्हाला काही फरक जाणवत नसेल. पाहा अब्राहामाने काय केले. जे तुम्ही पाहत आहा; त्यावरून तुम्ही निर्णय करू नका. तुम्ही तुमच्या लक्षणांकडे पाहू नका. तो जे बोलला आहे त्याकडे पाहा. जर तुम्ही बोललात, "मला अजूनही वेदना होत आहेत," त्याचा ह्या गोष्टीशी काही सबंध नाही. तुम्ही ते केले आहे जे देव करण्यासाठी बोलला. पाहा, त्याकडे पाहू नका. तो जे बोलला आहे त्याकडे पाहा. देव म्हणाला ते असे होते! मी विश्वास करतो. तुम्ही ठेवत नाही काय? (मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.) मी संपूर्ण हृदयाने, त्यावर विश्वास ठेवतो.

192 आपली पुन्हा भेट होईपर्यंत देव तुम्हाला आशीर्वादित करो. माझ्या प्रार्थना तुमच्यासाठी आहेत; रात्र फार झाली नाही, खूप पाऊस पडत नाही. मी तुमच्यासाठी प्रार्थना करीत राहीन. तुम्ही माझ्यासाठी प्रार्थना करा. आपण पुन्हा भेटेपर्यंत, देव तुम्हाला आशीर्वादित करो. आता पाळक भाऊ येतील.

**परीक्षेनंतर शत्रूचे फाटक काबीज करणे** MAR64-0322

(Possessing The Gate Of The Enemy After Trial)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी दुपारी, 22 मार्च 1964 साली, डॅन्हॅम स्प्रिंग्स येथे, डॅन्हॅम स्प्रिंग्स हायस्कूल लुसीयाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2017 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS
P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A
www.branham.org.